# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक ०३.०७.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०२.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून १,५२,३७०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०७ इसमांवर कारवाई करुन ५,९२०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,१८० वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,४७,२००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपींना अटक.**

फिर्यादी श्रीमती सुशिला प्रितमलाल बोरकर वय ६२ वर्ष रा. हनुमान नगर, रेल्वे स्टेशन जवळ, भांडेवाडी, नागपूर यांचा मुलगा नामे गणेश उर्फ गुरुदेव प्रितमलाल बोरकर वय ४५ वर्ष याचे आरोपी सौ. मनिषा गणेश बोरकर उर्फ मनिषा शांताराम पारधी वय ३७ वर्ष हिचेसोबत १४ वर्षापुर्वी लग्न झाले होते. गणेश हा आरोपी मनिषाचा दुसरा पती होता. गणेश व आरोपीचे नेहमी पारिवारीक कारणाने झगडा भांडण व्हायचे. भांडणाला कंटाळून मनिषा ही मुलांना घेऊन पतीचे घर सोडुन शामनगर पारडी नागपूर येथे राहत होती. त्यांचे एकदा कौंटुंबिक भांडण झाले असता, आरोपी मनिषाने तीचे पती गणेशला 'गणेश बोरकर, तुझा मर्डर करणार तर, मीच करणार, तु पाहुन घे' अशी धमकी सुध्दा दिली होती. दिनांक ०२.०७.२०२६ चे २०.१५ वा. ते २०.२० वा. चे दरम्यान, फिर्यादीचा मुलगा गणेश हा पोलीस ठाणे भांडेवाडी हद्यीत रेल्वे स्टेशन जवळील चहाचे दुकानातून घरी येत असता, हनुमान नगर येथील चकोलेच्या घरासमोर, दोन अनोळखी इसमांनी गणेशला जिवानिशी ठार मारण्याचे उद्येशाने त्याचेवर धारदार शस्त्राने वार करुन त्यास जिवानिशी ठार केले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे आरोपींविरूध्द कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व गुप्त माहितीवरून तसेच, मृतकाचे पत्नीने दिलेल्या धमकीबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या बयानावरुन व उपलब्ध प्राथमिक पुरावे यावरुन, आरोपी क्र. १) मनिषा गणेश उर्फ गुरुदेव बोरकर वय ३७ वर्ष रा. हनुमान नगर, प्लॉट क्र. १७६४, ह.मु. शामनगर, बाजार चौक, तडस यांचे घरी किरायाने, नाल्याचे बाजुला, भांडेवाडी, नागपूर २) अभिजीत पुरुषोत्तम साखरे वय २९ वर्ष रा. वार्ड क्र. ६, दशरथ कोहळे यांचे घरी किरायाने, नाका क्र. ७

जवळील धर्मशाळेमागे, कन्हान ता. कामठी जि. नागपूर ह.मु. आनंदनगर झोपडपट्टी, बबलु बर्वेचे घराजवळ, कन्हान, नागपूर यांना ताब्यात घेतले. आरोपींना वर नमुद गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार पाहिजे आरोपी क्र. ३) रोहीत बोरकर रा. कांद्री कन्हान तसेच एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांचे मदतीने संगनमताने गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी क्र. १ व २ यांना अटक करुन, पुढील कार्यवाहीस्तव भांडेवाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहर, मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नवीनचंद्र रेड्डी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे व त्यांचे पथकाने केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नवीन कामठी :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी श्रीमती सरीता अशोक खुरपडी वय ३७ वर्ष रा. आजनी गादा ता. कामठी जि. नागपूर यांची बहिण नामे सौ. भाग्यश्री विनोद रजक वय ३५ वर्ष ह.मु. रा. गादा कामठी, जि. नागपूर हिचा प्रेमविवाह सन २०१० मध्ये विनोद रजक रा. जबलपुर ह.मु. उप्पलवाडी, कपीलनगर याचेसोबत झाला होता. तो दारु पिण्याचे सवईचा असल्याने तो तिचे चारित्रावर संशय घेऊन भांडण करीत असे. या त्रासाला कंटाळून भाग्यश्री ही नवऱ्याला सोडून माहेरी आली होती. माहेरी राहत असतांना तिने सन २०२३ मध्ये राजेंद्र नत्थुजी कोटरुंगे वय ४५ वर्ष रा. नांदगाव, येसंबा ता. पारशिवनी जि. नागपूर याचेसोबत मंदीरात दुसरे लग्न केले होते. दुसरा पती राजेंद्र हा सुदधा भाग्यश्री हिला मारझोड करुन त्रास देत असल्याने, ती त्याला सोडून आपले बहिणीकडे कामठी, गादा येथे राहून खाजगी काम करीत होती. दरम्यान दुसरा पती राजेंद्र हा तिला तिचे कार्यस्थळी व माहेरी जाऊन 'घरी चल' असे म्हणून नेहमी त्रास देत असे. त्यांचा वाद गादा ग्रामपंचायत सरपंच व पोलीस पाटील यांचेकडे नेला असता, तेथे राजेंद्र वापरत असलेल्या दुचाकीचे मासिक हफ्ते भाग्यश्री भरत असल्याने तिने गाडीची चाबी त्याचेकडून हिसकावून घेतली होती. त्याचा राग आल्याने, त्याने भाग्यश्रीला पाहून घेण्याची धमकी दिली होती. दिनांक ०२.०७.२०२६ रोजी सकाळी भाग्यश्री आपले कामावर गेली असता, तेथून सायंकाळी १७.४० वा. तिने तिचे मुलीसोबत फोनद्वारे संपर्क केला होता. परंतु ती नेहमीप्रमाणे वेळेवर घरी न आल्याने फिर्यादी हया भाग्यश्रीचे शोधार्थ शिरपुर रोडने जात असता, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्यीत घोरपड ते शिरपूर रोडवर भाग्यश्री ही रक्तबंबाळ व मृत अवस्थेत मिळून आली. तिला कोणीतरी कोणत्यातरी धारदार शस्त्राने वार करुन जिवानिशी ठार केले अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि. रामेश्वर कायंदे ८८८८८४८५७३ यांनी आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे इमामवाडाः— जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

फिर्यादी आर्यन विजय कांबळे वय १९ वर्ष रा. एनआयटी गार्डनजवळ, चंद्रमणी नगर, अजनी, नागपूर हे हजारेवाडी, वकीलपेठ इमामवाडा येथे राहणारी त्यांची मैत्रिण हिचे घरी जात असता, दिनांक ०१.०७.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे इमामवाडा हद्यीत बोकडेच्या किराणा दुकानाजवळ फिर्यादीचे ओळखीचा असलेला आरोपी नामे सुजल मंगेश पानतावणे वय २० वर्ष रा. सिरसपेठ, इंगळे भवन, इमामवाडा, नागपूर याने येऊन फिर्यादीचा रस्ता अडवून, फिर्यादीचा मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने विरोध केला असता, आरोपीने त्याचेजवळील चाकू काढून फिर्यादीचे हाताकडे चाकू फिरविला. फिर्यादीने वार चुकवून आपला बचाव केला. आरोपीने चाकूचा धाक दाखवून फिर्यादीजवळील पांढरे रंगाचा सॅमसंग मोबाईल कि. २,०००/— रु कि. चा

हिसकावून तेथून पळून गेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणा इमामवाडा येथे पोउपनि. नितेश सानप ८६६९०६१८७९ यांनी आरोपींविरूध्द कलम ३११,३०९(४),१२६(२) भा.न्या.सं. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करुन तात्काळ दखल घेतली व आरोपीचा शोध घेऊन आरोपीस दिनांक ०२. ०७.२६ रोजी अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे खापरखेडा:— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०१.०६.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा नामे अश्विन आनंदराव गजभिये वय ३६ वर्ष रा. वार्ड क्र. २, खापरखेडा ता. सावनेर जि. नागपूर हा त्याचे युनिकॉर्न मोटार सायकल क्र. एमएच ४० सीके ८१७३ ने भानेगाव ते खापरखेडा रोडने खापरखेडाकडे येत असता, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीतील, महाराष्ट्र विद्यालयसमोर एका मारोती सुजुकी रिटज् कार क्र. एमएच ३१ ईके ९८४९ चे चालकाने, त्याचे ताब्यातील वाहन विरुध्द दिशेने भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मुलाचे सायकलला समोरुन धडक दिली. अपघातामध्ये फिर्यादीचा मुलगा गभीर जखमी झाला. त्यास उपचाराकरीता मॅक्स हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक ०२.०७.२०२६ रोजी १२.३६ वा. डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी आनंदराव चंद्रभान गजभिये वय ६६ वर्ष रा. वार्ड क्र. २, खापरखेडा ता. सावनेर जि. नागपूरयांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे मपोउपनि. प्रियंका पाटील ७४७७८१८९६६ यांनी आरोपी कार चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१,१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>४) पोलीस ठाणे कळमणा :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, प्लॉट नं. १७३४, मिनी माता नगर, जानकी नगर चौक, कळमणा, नागपुर येथे यांचे प्लॉट नं. १३७, गांजाखेत चौक, नागपुर येथे राहणारे फिर्यादी लोकनाथ छोटेलाल यादव वय ६२ वर्षे यांची पत्नी व लहान मुलगा असे दोघे चित्रकुट, उत्तरप्रदेश येथे गेले असल्याने, राहते घरी फिर्यादी व त्यांचा मोठा मुलगा राहत होते. दिनांक ०१.०७.२०२६ चे १०.३० वा. ते १८.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी आपले राहते घराचे गेटचे दाराची कडी लावून आपले दुकानात गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दरवाजा उडघून, आंत प्रवेश करून बेडरुममधील लोखंडी आलमारीतील रोख १,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकूण १,९४,०००/— रु. चा मुद्देमाल चोरुन नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. प्रमोद ढोबळे ७७२१०७९७४९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे बेलतरोडी</u> :—** दिनांक ०२.०७.२०२६ चे २१.११ वा. चे सुमारास फिर्यादी धर्मपाल विठ्ठल मेश्राम वय ५९ वर्ष, रेल्वे ट्रॅकमॅन, हे रेल्वे ट्रॅक चेक करीत असतांना, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्यीतील अजनी ते खापरी रेल्वे लाईन दरम्यान इलेक्ट्रीक पोलक्र. ८२९/९बी ते ८२९/९ए, चौथी लाईन, नागपूर ते खापरीकडे जाणारे रेल्वे लाईनचे मोकळया जागेत एक अनोळखी वय अंदाजे ६० वर्ष वयाचे पुरुष इसम रेल्वेची धडक लागल्याने मृत अवस्थेत मिळून आले. मृतदेह पुढील कार्यवाहीकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे पाठविण्यात आला आहे. मृतकाची ओळख पटलेली नाही. मृतकाचे वर्णन— चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची ५ फुट ५ इंच, डोक्याचे केस—काळे पांढरे, दाढी मिशी—काळी पांढरी व वाढलेली असून अंगाभोवती चादर गुंडाळलेली आहे. मृतकाचे वर्णनावरुन त्यांना ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे बलतरोडी येथे संपर्क साधावा.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे बेलतरोडी येथे मपोउपनि. पुनम खिल्लारे ७०६६१२०५२४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सक्करदरा** :— दिनांक ०१.०७.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास ताजबाग येथे भिक्षा मागून उदरनिर्वाह करणारी अनोळखी महिला वय अंदाजे ६० ते ६५ वर्ष ही पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील बिसा बाबा गौसिया दर्गाहजवळ, शेख कासिम यांचे घरासमोरुन जात असतांना रोडवर पडलेल्या पोलला स्पर्श झाल्याने, त्यांना लोखंडी पोलमध्ये पावसाचे पाण्याने निर्माण झालेला ईलेक्टीक करंट लागून त्या जागीच मरण पावल्या. नमुद महिलेचा मृतदेह पुढील कार्यवाहीकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे पाठविण्यात आला आहे.

यापकरणी फिर्यादी अब्दुल खानिद अब्दुल गनी वय ४८ वर्ष रा. प्लॉट क्र. २३, गौसिया कॉलनी, ताजबाग, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे सक्करदरा येथे सपोनि. प्रमोद होळगे ८४८४०४२००३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**